दिव्य मराठी धाराशिव जिल्हा 30-09-2024

# देशसेवेसाठी युवकांनी पुढे यावे

## एनसीसी कॅम्पमध्ये सहायक पोलिस निरीक्षक श्रीकांत भराटे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी | उमरगा

आजच्या युवकांनी देश सेवेत योगदान देवून आपला भारत देश अधिकाअधिक कसा बळकट होईल, यासाठी पुढे आले पाहिजे. देशच्या‍ा सर्वांगीण विकासात हातभार लावावा असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत भराटे यांनी केले.



शिवाजी महाविद्यालयात कॅंपचे आयोजन करण्यात आले होते.

५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूरच्यावतीने सीएटीसी-२२३ दहा दिवशीय कॅंपचे श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयामध्ये आयोजन करण्यात आले आहे.शनिवारी (२८) तरुणा पुढील आव्हाने या विषयावर सपोनि भराटे बोलत होते.लेफ्टनंट कर्नल वाय. बी. सिंग हे अध्यक्षस्थानी होते.यावेळी पोलीस उपनिरिक्षक अनुसया माने, प्रतीक्षा पांगे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना भराटे म्हणाले की, युवकांनी एनसीसी च्या माध्यमातून देशसेवेसाठी पुढे यावे.कारण एनसीसीतून लाखो कॅडेटस उतीर्ण होऊन अधिकारी, आर्मी, पोलीस बीएसएफ, सीआयएसएफ मध्ये भरती होऊन देशसेवा करत आहेत. तसेच स्पर्धा परीक्षा देऊन वर्ग एकचे अधिकारी होवून देश, समाजाची सेवा करू शकतात त्यासाठी आत्मविश्वास बाळगून चांगल्या व्यक्तिमत्वाचा विकास करावा असे आवाहन केले.

यावेळी अनुसया माने यांनी पोस्को कायदा बालगुन्हेगारी, महिलांचे कायदे याबदल मार्गदर्शन केले. प्रतीक्षा पांगे यांनी सुद्धा वाढत्या सायबर गुन्हेगारीबदल मार्गदर्शन केले. कॅप्टन डॉ. ज्ञानेश्वर चित्तमपल्ले यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी सुभेदार मेजर शंभू सिंग, लेफ्टनंट के. डब्ल्यू. पावडे,सेकंड ऑफिसर जाधव,थर्ड ऑफिसर मधुबाला आंधळे पोलीस कर्मचारी व कॅडेटस उपस्थित होते.